ये धक्का!!

सुराज्य सोलापूर

बुधवार, दि. ३ एप्रिल २०२४ । पान १२

वंचितचे आणखी पाच उमेदवार कोणाला पाडणार! कोणाला तारणार!!

लोकसभेसाठी वंचित बहुजन आघाडीने पाच उमेदवारांच्या नावाची घोषणा केली. यामध्ये पुणे लोकसभा मतदारसंघातून वसंत मोरे यांना 'वंचित'कडून उमेदवारी देण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी वसंत मोरे यांनी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची भेट घेत उमेदवारी संदर्भात चर्चा केली होती. यानंतर अखेर वसंत मोरे यांना 'वंचित'कडून उमेदवारी जाहीर झाली आहे. यासंदर्भातील माहिती वंचित बहुजन आघाडीने ट्विटरवरून दिली आहे. पुणे लोकसभा मतदारसंघात काँग्रेसकडून रवींद्र धंगेकर तसेच भाजपाकडून मुरलीधर मोहोळ निवडणुकीच्या मैदानात आहेत. आता वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे यांना उमेदवारी जाहीर झाल्यामुळे पुण्यात तिरंगी लढत होणार आहे. वसंत मोरे यांनी काही दिवसांपूर्वी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचीदेखील भेट घेतली होती. तसेच खासदार शरद पवार यांचीही भेट घेतली होती. वसंत मोरे यांनी या भेटी पुण्यातून उमेदवारी मिळण्यासंदर्भात घेतल्याचे सांगितले जात होते. वंचित बहुजन आघाडीने आघाडीने अधिकृत ट्विटर अकाऊंटवरुन उमेदवारांची घोषणा केली. यामध्ये अविनाश भोसिकर-नांदेड, बाबासाहेब भुजंगराव उगले-परभणी, अफ्सर खान-छत्रपती संभाजीनगर, वसंत मोरे-पुणे, मंगलदास बांदल-शिरुर, या पाच उमेदवारांची यादी ट्विटरवरुन जाहीर केली आहे.

तोल-मोल के बोल...

मी स्वत: उमेदवार असताना माझ्यावर टीका करण्यापेक्षा किंवा मला थेट भिडण्यापेक्षा वडील सुशीलकुमार शिंदे यांना धादांत खोट्या आरोपांच्या माध्यमातून टीकेचे लक्ष्य बनविले जात आहे. सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूरचा विकास करण्याऐवजी दक्षिण आफ्रिकेत स्वत:चे चहाचे मळे उभारले आहेत, इथपर्यंत खोटे आरोप केले जात आहेत. भाजपच्या हाती मागील दहा वर्षांपासून सत्ता असताना आमच्या कुटुंबीयांची चौकशी करायला हवी होती. ती का केली नाही?

– प्रणिती शिंदे
काँग्रेस उमेदवार (काँग्रेस पक्ष)

सोशल मीडियावर निवडणुकीचं धूमशान

प्रणिती शिंदे राम सातपुते यांच्यात टसल

सोलापूर लोकसभेसाठी भाजपकडून आमदार राम सातपुते आणि काँग्रेसकडून आमदार प्रणिती शिंदे यांच्या जोरदार टशन दिसून येत आहे. उमेदवारी जाहीर झाल्यापासून दोघेही उमेदवार मतदारसंघ पिंजून काढत आहेत. तर दुसरीकडे त्यांचे समर्थक आणि कार्यकर्ते सोशल मीडियाचा जोरदार वापर करताना दिसून येत आहेत. एकंदरीत, आमदार राम सातपुते आणि आमदार प्रणिती शिंदे यांच्यामध्ये विविध कारणांनी कलगीतुरा रंगत आहे. दोघांच्या समर्थकांमध्ये सोशल मीडियावर टस्सल पाहायला मिळत आहे.

महत्त्वाचे म्हणजे भाजपकडून 'जय श्रीराम'चा नारा देण्यात येत आहे. तर काँग्रेसने 'संविधान बचाव' वर भर दिला आहे. याशिवाय 'अबकी बार चारसो पार' या भाजपच्या घोषणेला 'अबकी बार भाजप तडीपार' असे प्रत्युत्तर काँग्रेसकडून सोशल मीडियावर दिले जात आहे.

पूर्वीच्या काळी प्रचाराची खूप वेगळी पद्धत होती. उमेदवाराचा प्रभाग, नाव, चिन्ह भिंतीवर काढले जायचे. कालांतराने प्रचार पद्धतीत बदल होत गेल्यामुळे आता प्रचारात थेट सोशल मीडियाचा वापर होऊ लागला आहे. निवडणूक आयोगाने यावर कितीही मर्यादा घालण्याचा प्रयत्न केला. सध्या तरी सोशल मीडियावरून प्रचार रोखणे अशक्य झाले आहे. सोलापुरातही असाच प्रकार दिसून येत आहे आमदार राम सातपुते आणि आमदार प्रणिती शिंदे यांचे समर्थक सोशल मीडियावर जोरदार प्रचार करत आहेत.

आमदार राम सातपुते यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून काँग्रेसने स्थानिक आणि उपरा उमेदवार याच मुद्द्यावर भर दिला आहे. सोशल मीडियावर हाच मुद्दा काँग्रेस कार्यकर्ते उचलून धरत आहेत आमदार राम सातपुते हे बीडचे असल्यामुळे 'बीडचे पार्सल बीडला पाठवा' अशा पद्धतीच्या पोस्ट सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. तसेच आमदार प्रणिती शिंदे यांचा फोटो असलेला 'सोलापूरची लेक' ही पोस्ट काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात डिजिटल मीडियावर व्हायरल करताना दिसून येत आहेत. याशिवाय भाजपच्या मागील दोन खासदारांनी मागील दहा वर्षात काय केले? याचाही जाब काँग्रेस कार्यकर्ते पोस्ट च्या माध्यमातून विचारत आहेत. याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही टीका केली जात आहे. भाजप हुकूमशाही करत आहे. तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी विराजमान झाले तर भाजप संविधान बदलेल अशी पोस्ट व्हायरल करून संविधान बचावचा नारा काँग्रेसकडून दिला जात आहे.

दुसरीकडे भाजपचाही सोशल मीडिया जोरदार काम करताना दिसत आहे. २००४ रोजी आईसाहेब, २०१४ रोजी शिंदेसाहेब तर २०२४ रोजी ताईसाहेब यांना पराभव करा अशी पोस्ट जोरदार व्हायरल केली जात आहे. याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात केलेल्या विकास कामांची यादी ही सोशल मीडियावर भाजपचे पदाधिकारी टाकत आहेत. सोलापुरात झालेले रस्ते, स्मार्ट सिटीची कामे यासह अनेक कामांची यादी ही भाजप पदाधिकाऱ्यांकडून व्हायरल करण्यात येत आहे. महत्त्वाचे म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळेच आयोध्यामध्ये राम लल्लाची प्रतिष्ठापना झाली अशी पोस्ट करत भाजप पदाधिकारी जय श्रीरामचा नारा देताना दिसत आहे.

शिंदे, सातपुते सोशल मीडियावर अपडेट

दोन्ही उमेदवारांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते दिवस-रात्र सोशल मीडियावर अपडेट टाकत आहे. आमदार राम सातपुते दिवसभर कोणत्या मतदारसंघात होते, कोणाच्या गाठीभेटी घेतल्या. याचे अपडेट प्रत्येक मिनिटाला सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. तर दुसरीकडे आमदार प्रणिती शिंदे यांचे प्रत्येक ठिकाणी झालेले भाषणही काँग्रेस पदाधिकारी सोशल मीडियावर अपलोड करताना दिसून येत आहेत. एकंदरीत दोन्ही पक्षाकडून विकासकामांचे आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांचे चित्रण मांडले जात आहे. दोन्ही उमेदवार डिजिटल प्रचारावरही भर देत आहेत. त्यात राजकारणातील उणीदुणी काढली जात आहेत. सोशल मीडियावरील प्रचारातून आता कोण बाजी मारणार? याची उत्सुकता प्रत्येकाला लागून आहे.

हम भी कुछ कम नही

सोलापुरात भाजप आणि काँग्रेसच्या पदाधिकाऱ्याकडून सोशल मीडियावर खास करून व्हाट्सअप ग्रुपवर मोठ्या प्रमाणात प्रचार होत आहे. सोलापुरातील अनेक महत्त्वाच्या ग्रुपवर काँग्रेस आणि भाजपचे पदाधिकारी एकत्रित आहेत. भाजपने पोस्ट केली की त्याला लागलीच काँग्रेसकडून उत्तर देण्यात येत आहे. याशिवाय काँग्रेसने केलेल्या पोस्टलाही भाजपकडून 'जशास तसे' उत्तर देण्यात येत आहे. त्यामुळे रोजच व्हाट्सअप ग्रुप वर शाब्दिक वार दोन्ही पदाधिकाऱ्यांमध्ये दिसून येत आहे. त्यामुळे व्हाट्सअप ॲडमिनची मात्र गोची होत असल्याचे दिसून येत आहे.

मनसे आदेशाच्या प्रतिक्षेत

सोलापूर : लोकसभा निवडणुकीचा पहिला टप्पा १९ एप्रिल रोजी होत आहे. महायुती विरूद्ध महाआघाडी असा सामना संपूर्ण महाराष्ट्र होणार आहे. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात ४५ पेक्षा जास्त जागा मिळवण्याचा चंग महायुतीने बांधला आहे. त्यामुळे एक एक घटक पक्षाला ते जवळ करत आहेत. काही दिवसांपूर्वी भाजपने मनसेलाही महायुतीमध्ये सामिल करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, अद्याप तो निर्णय झालेला नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र प्रमाणे सोलापुरातही मनसेचे पदाधिकारी नेते आणि कार्यकर्ते द्विधा मनस्थितीत आहेत. पक्ष प्रमुख राज ठाकरे यांच्या आदेशाची वाट पाहत आहेत.

भाजपही मदतीच्या अपेक्षेत

सोलापुरात राज ठाकरेंची क्रेझ

सोलापुरात राज ठाकरे यांच्या यापूर्वी दोन सभा झाल्या आहेत. या दोन्ही सभेला मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. ठाकरे यांच्या सभाचे मतांमध्ये रूपांतर होवो अथवा न होवो त्यांच्या सर्वांना नागरिक गर्दी करतात हे तितके सत्य आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यानी भाजप विरोधी भूमिका घेतली होती आणि त्यातूनच सोलापुरात भव्य सभा घेतली होती. आता मनसे जर महायुतीमध्ये गेल्यास सोलापुरातही पुन्हा एकदा राज ठाकरे यांची सभा होईल, असे भाजपचे पदाधिकारी बोलत आहेत.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, ९ एप्रिल रोजी गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर राज ठाकरे आपली भूमिका जाहिर करणार आहेत, त्यानंतरच खऱ्या अर्थाने मनसे कोणाच्या बाजूने जाणार हे करणार आहे. सोलापूर लोकसभेसाठी भाजपकडून आमदार राम सातपुते आणि काँग्रेसकडून आमदार प्रणिती शिंदे यांच्यामध्ये लढत होत आहे. सध्य परिस्थितीत वंचित ने आपला उमेदवार जाहिर केला आहे. तर एमआयएम उमेदवार जाहीर करण्याच्या तयारीत आहे, असे सांगण्यात येते. त्यामुळे काँग्रेसची डोकेदुखी काही प्रमाणात वाढली आहे. दुसरीकडे भाजपने एक एक मित्र पक्ष जोडण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळेच भाजप मनसेला जवळ करण्याचा प्रयत्न करत आहे. मनसेसाठी एक जागा सोडून पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा उपयोग इतरत्र करुन घेण्याचे भाजपचे नियोजन आहे. त्यासाठी भाजप आणि राज ठाकरे यांची बोलणीही झाली आहेत.

मात्र, निर्णय कोणताही झाला नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र प्रमाणे सोलापुरातही मनसे पदाधिकारी संभ्रमात पडले आहेत. सोलापूर शहर आणि सोलापूर मतदारसंघात मनसेची थोडीफार प्रमाणात ताकद आहे. सोलापूर शहरातील उत्तर भागात तसेच पंढरपूर मतदारसंघात बऱ्यापैकी मनसेचे अस्तित्व आहे. पश्चिम महाराष्ट्राचे नेते दिलीप धोत्रे, सोलापुरातील नेते विनायक महिंद्रकर, प्रशांत इंगळे, जैनुद्दीन शेख, अमर कुलकर्णी यांनी मनसेचे अस्तित्व काही प्रमाणात ठेवले आहे.

'वंचित' आघाडीच्या नवख्या चेहऱ्यांचा मताधिक्यात दिसणार का 'करिष्मा'

जागा वाटपाच्या कारणावरून वंचित आघाडीचे सर्वेसर्वा डॉ. प्रकाश आंबेडकर महाआघाडीपासून वेगळे झाले आहेत. त्यांनी आता सर्वच ठिकाणी उमेदवार देण्याचे ठरवले आहे. त्यापैकी वीस जणांची यादी जाहीर केली आहे. यात सोलापुरातून राहुल गायकवाड तर माढा मधून माळी समजाचे रमेश बारस्कर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मागच्या वेळेस सोलापूर लोकसभा निवडणुकीमध्ये वंचितने चांगली कामगिरी केली होती. त्यामुळे यंदा त्यांचा उमेदवार कोण असणार याबद्दल उत्सुकता होती. मात्र त्यांनी अगदी नवख्यात उमेदवाराला संधी दिल्यामुळे यंदा वंचित ताकदीने लढणार का? याची चर्चा मतदारसंघात सुरू आहे.



गेल्या लोकसभा निवडणुकीत वंचितने अनेक ठिकाणी उमेदवार उभे केले होते. संपूर्ण महाराष्ट्रात वंचितच्या उमेदवारांनी तब्बल ४० लाखांच्या आसपास मते घेतली होती. त्यामुळे वंचित फॅक्टर यंदाच्या निवडणुकीत चालणार का? अशी चर्चा गेल्या वर्षापासून सुरू होती. डॉ. प्रकाश आंबेडकर आघाडीत जाणार असे सर्वांना वाटत होते. मात्र जागा वाटपाच्या कारणावरून ते बाहेर राहिले. त्यामुळे आता त्यांनी सर्वच ठिकाणी उमेदवार जाहीर करण्याचे ठरवले आहे. त्यांनी स्वतः अकोल्यातून उमेदवारी जाहीर केली आहे तर सोलापुरातून अक्कलकोट तालुक्यातील रहिवासी राहुल गायकवाड यांना तर माढ्यातून मोहोळचे रहिवासी रमेश बारसकर यांना उमेदवारी दिली आहे. राहुल गायकवाड राजकारणात हे नवखे उमेदवार असल्याने त्यांचा सोलापुरात प्रभाव पडणार का असेही चर्चा आता सुरू झाली आहे.

गेल्या लोकसभा निवडणुकीत सोलापुरातून खुद्द डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी निवडणूक लढवली होती. डॉ. बाबासाहेबाचे ते थेट वारसदार असल्यामुळे अनेक दलित संघटना त्यांच्या पाठीमागे उभ्या राहिल्या होत्या.

आंबेडकरी रक्त म्हणून प्रकाश आंबेडकरांच्या पाठिशी दलित समाजाने मोठी ताकद लावली. त्यातून त्यांना तब्बल एक लाख ७० हजार मते पडली होती. त्यामुळेच काँग्रेसचे उमेदवार सुशीलकुमार शिंदे यांचा पराभव झाला असेही आज राजकीय जाणकार सांगतात. निवडणुकीत वंचितने चांगली मते घेतल्यामुळे यंदा वंचित सोलापुरात उमेदवार उभा करणार का आणि केला तर तो कोण असणार याकडे सर्वांचे खास करून काँग्रेस पक्षाचे लक्ष लागले होते.

मात्र वंचितने सर्वांना धक्का देत राहुल गायकवाड या नवख्या उमेदवाराचे नाव जाहीर केले. त्यामुळे राहुल गायकवाड हे लोकसभा निवडणुकीत प्रभाव टाकतील का? हे पहावे लागेल.

दुसरीकडे माढा मतदारसंघातून माळी समाजाचे रमेश बारसकर यांना वंचितने उमेदवारी दिली आहे. वंचितने उमेदवारी दिल्याने त्यांची शरद पवार गटातून हाकालपट्टी केली आहे. गेल्या वेळेस माढा मतदारसंघातून ॲड. विजय मोरे यांनी निवडणूक लढवली होती. त्यांना ५१ हजार मते पडली होती.

आता रमेश बारस्कर हे माढा लोकसभा निवडणुकीत किती मते घेतात आणि त्याचा कोणाला फटका बसतो याची गोळा बेरीज माढा मतदारसंघात सुरू झाली आहे. बारसकर यांचे कार्यक्षेत्र हे माढा लोकसभा मतदारसंघाच्या बाहेर आहे, त्यामुळे माढ्यातून ते किती मते घेतात, हे पाहावे लागणार आहे.

गेटकेन उमेदवारीचा मुद्दा

रमेश बारसकर हे मुळचे मोहोळचे आहेत. ज्योती क्रांती परिषदेच्या माध्यमातून त्यांचे राज्यभर काम आहे. मोहोळचे पहिले नगराध्यक्ष म्हणूनदेखील त्यांनी काम पाहिलेले आहे. तथापि, त्यांना वंचितने माढ्याची उमेदवारी दिली आहे. त्यांच्या गेटकेन उमेदवारीचा या मतदार संघात मुद्दा येऊ शकतो.

तगड्या उमेदवारांसोबत गायकवाडांची झुंज

सोलापूर लोकसभेच्या आखाड्यात तरूण तडफदार, आक्रमक, अभ्यासू आमदार प्रणिती शिंदे आणि आमदार राम सातपुते या दोघांमध्ये काँटे की टक्कर लागली आहे. या तगड्या उमेदवारांसोबत वंचितच्यावतीने राहुल गायकवाड यांना फाईट द्यावी लागणार आहे, ते कशी फाईट देतात, प्रचाराचे कोणते मुद्दे उपस्थित करतात, प्रचार यंत्रणा कशी लावतात? वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर किती सभा घेतात? दलितांची मते गायवाडांच्या पाठिशी कसे लावतात हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

विवाह इच्छुकांसाठी काम हा बारसकरांचा अजेंडा

'आम्ही लग्नाळू' असा नारा देत सोलापूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर विवाह इच्छुक तरुणांचा मोर्चा काढून तरुणांचे विवाह जमत नसल्याच्या निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नाकडे सरकार लक्ष वेधून महाराष्ट्रात चर्चेत आलेल्या रमेश बारसकर यांनी वंचितची उमेदवारी जाहीर होताच आपल्या कामाचा अजेंडा सांगून टाकलाय. लग्न जुळत नसलेल्या तरुणांसाठी आपण काम करणार असल्याचे त्यांनी सांगून टाकले आहे. मतदारांना आकर्षित करण्याचे फंड पक्ष किंवा उमेदवार राबवित असतात. त्याप्रमाणे लग्नपासून वंचित राहावे लागत असलेल्यांना दिलासा देऊन त्यांची मते पदरात पाडून घेण्याचा वेगळा फंडा बारसकरांचा दिसतोय.